" नांदेड जिल्हयातील कुष्ठरोग्यांच्या समस्या " : एक समाजशास्त्रीय अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत, सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील, समाजशास्त्र विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीच्या अंशतः पुर्ततेसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

*** संशोधज ***

पवित्रे जि शन यादवराव

*** मार्जदर्शज ***

डॉ. बुरुडे एस.बी.

समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक मार्गदर्शक, श्री. शिवाजी कॉलेज जंधार ता. कंधार जि. नांदेड

*** संशोधन जेंद्र ***

सामाजिकशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

ऑगस्ट -२०१६

प्रस्तावना :

कुष्ठ रोग हा मानवा इतकाच जुना व अतिप्राचीन आहे. या रोगाकडे महाभंयकर रोग म्हणुन पाहिले जाते. या संपुर्ण जगाच्या पाठीवर कुठल्या ना कुठल्या देशात या रोगाचे कमी- अधिक प्रमाणात अस्तित्व दिसुन येते. काही ठिकाणी काही कारणामुळे तो बराही झाला पण पृथ्वीच्या पाठीवर कुठेतरी तो सतत मानवी शरीराची नासधुस करतच असतो.

काही तज्ञ लोकांच मत असे आहे की हा रोग चिन मधुन परसला तर काही म्हणतात तो मध्य आफ्रिकेतुन पसरला. काही म्हणतात तो भारतातून परसला प्रथम युरोपीयन देशात दिसत नाही पण एकेकाळी तिथेही कुष्ठरोग पसरला होता. कुष्ठ रोग हा संसर्गजन्य समजला जाई शिवाय त्यावर औषधे उपलब्ध नसल्याने ज़ु ष्ठरोग्याना समाजातुन दुर ठेवल्या जाई काही ठिकाणी तर कुष्ठरोग याला समाजापासुन सक्तीने दुर ठेवल्या जात असत.

कुष्ठरोग हा मायकोबॅक्टेरिअम लेप्री या सुक्ष्मजंतुमुळे किंवा जिवाणुमुळे होतो हे आता सिध्द झालेले आहे. सिगारेटच्या आकाराचे कुष्ठरोगाचे हे जंतु इतके सुक्ष्म असतात की ते सुक्ष्मदर्शक यंत्राखालीच दिसु शकतात. त्याची लांबी २ ते ७ मायक्रॉन (१ मायक्रॉन = १ मिलिमीटरचा एक हजारावा भाग) व रुंदी ०.३ ते ०.५ मायक्रॉन इतकी असते. डॉ. हॅन्सेन यांनी मायकोबॅक्टेरिअम लेप्री हा कुष्ठरोगाला कारण असलेला जिवाणु प्रथम पाहिला म्हणुन कुष्ठरोगाला 'हॅन्सेन्स डिसीज' असेही म्हटले जाते.

कुष्ठरोग जंतुचा प्रसार कोणत्या माध्यमातुन होतो यावर अद्यापही संशोधन चालु आहे. परंतु सांसार्ज्जि ज़ु ष्ठरोग्याचा दिर्घकाळचा निकटस्पर्श किंवा त्याने शिंक, थुंकी किंवा खोकला या वाटे हवेत सोडलेले जंतु यामुळे कुष्ठरोगाचा प्रसार होत असावा असे शास्त्रांना वाटले. शरीरात हा जंतु कोणत्या मागार्ने शिरज़ाव ज़रतो याचीही अजुन काहीच निश्चित माहिती झालेली नाही. शरीराची फुटीर त्वचा किंवा श्लेष्मल त्वचेच्या पातळ फुटीर पडद्यातुन हा जंतु शरीरात प्रवेश करतो असे मानले जाते.

कुष्ठरोग पसरविण्याची क्षमता असलेले कुष्ठरोगी म्हणजेच सांसर्गिक प्रकारचे कुष्ठरोगी केवळ १५ ते २० टक्के असतात. उलट ८०- ८५ टक्के रोगी असांसर्गिक प्रकारातील असतात.

भिकारी कुष्ठरोगी कुष्ठरोग पसरवतात असा एक गैरसमज आहे. खरे तर शहरात किंवा इतर ज ोणत्याही भागात एकुण कुष्ठरोग्यांत भिकारी कुष्ठरोगी फक्त ५ टक्केच असतात. त्यातील ८० टक्क्याहुन अधिक असांसर्गिक असतात. त्यामुळे कुष्ठरोग प्रसारात भिकारी कुष्ठरोग्यांना जबाबदार धरणे चुक आहे. ज ारण इतर ९५ टक्के कुष्ठरोगी समाजातच वावरत असतात. समाजात योग्य आरोग्यशिक्षण देऊन प्रथमावस्थेतील रोगी वेळेवर औषधोपचाराखाली आणल्यास भिकारी कुष्ठरोगी हा प्रश्नच पुढे निर्माज होजार नाही.

कुष्ठरोग जंतु शरीरात शिरल्यावर मज्जातंतु किंवा चेतातंतुवर हल्ला करतात. त्यामुळे तळहात किंवा तळपायाकडील स्पर्शज्ञान नष्ट होते. अशा वेळी रोग्याला हाताला किंवा पायाला दुखले, खुपले, भाजले तरी ज ाही वेदना होत नाहीत. त्यामुळे जखमांची काळजी घेतली जात नाही. जमखा वाढत जाऊन हाडापर्यंत पोचतात व परिणामी हाता पायांना विकृती येतात. म्हणजे एक गोष्ट लक्षात येते की, कुष्ठरोग्याचया हातापायांना होणाऱ्या जखमा या प्रत्यक्ष कुष्ठरोगाच्या जंतुमुळे होत नाहीत. कुष्ठजंतु शरीरातील चेतातंतुवर आघात करतात. त्यामुळे शरीराच्या काही भागावरचे स्पर्शज्ञान ज िवा संवेदना नष्ट होतात. अशा ठिकाणी भाजले, जखमा झाल्या तरी ते लक्षात येत नाही. त्यामुळे जखमा वाढत जातात व परिणामतः बोटे झडतात. तळपायाला बोचलेले काटे, दगड समजत नाहीत व जखमा वाढत जातात, विकृती येतात.

कुष्ठरोगाचे जंतु चेतातंतु बधीर करतात, त्यामुळे हाताची बोटे, पायाची बोटे बधीर होतात. उष्ज जार हा भेद त्यांना जाणवत नाही. कुष्ठरोगी विद्रुप होवुन विकृत होऊन भयंज र दिसु लागतो. किळसवाणा वाटतो. हातापायाची बोट झडतात, नाकाची केवळ भोकच उतात. चेहरा विद्रुप होतो, सिंहाच्या तोंडासारखा दिसतो. शरीराला पुर्ण विद्रुप करुन, त्याला भयानक बनवुन मग हे जंतु आपोआप नाहीसे होतात अशा भयानक चेहेऱ्याच्या कुष्ठरोग्यांना 'बर्न्ट आऊट' रुग्ण म्हणतात. आपल्याला रस्त्यावर जे कुष्ठरोगी दिसतात ते बहुतांशी असे 'बर्न्ट आऊट' असतात.

आधुनिक औषधोपचारांन हा रोग निश्चितपणे बरा होतो. सुरुवातीलाच जर औषधोपचार सुरु केले तर रोगी बरा तर होतोच पण त्याच्या अंगावर रोगाच्या खुणाही उरत नाहीत. पण या रोगाची प्राथमिज लजजे ओळखली पाहिजेत. सुरुवातीच्या लक्षणापैकी एक म्हणजे शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट किंवा ताबुस,

न खाजणारा, स्पर्शज्ञान नसलेला चट्टा दिसणं किंवा त्वचा तेलकट, लालसर होण, त्वचेचा पोत बदलणं यापैकी कुठलांही लक्षज दिसल की नि:संकोचपणे तज्ञांकडे जाऊन तपासणी करुन घ्यावी. पण हेही लक्षात घ्यावं की शरीरावर येणारा प्रत्येक चट्टा हा कुष्ठरोगाचाच असतो असे मुळीच नाही. त्वचेचा इतर रोगांमध्येही त्वचेच्या रंगात बदल घडू शकतात. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता अधिक असते. तसे होऊ न देता शरीरावरील कोणताही चट्टा प्रथम डॉक्टराकडे जाऊन तपासुन घेण्याची आवश्यकता असते.

कुष्ठ रोग्यावर घालण्यात आलेले निर्बंध

१. जिथे लोक जमत असतात अशा चर्च, बाजार, किंवा सभा स्थानात रोग्याना प्रवेश निषेध होता.

२. कुष्ठरोग्याचे भांडे, वस्त्र सार्वजनिक ठिकाणी धुण्यास सक्त मनाई होती.

३. कुष्ठरोग्यांना ठरवुन दिलेले कपडेच परिधान करावे लागत असत.

४. कुष्ठरोग्याला हवी असलेली वस्तु काठीने दाखवावी लागत असत.

५. कोणत्याही परस्त्रीजवळ राहण्यास मनाई होती.

६. कुठल्याही मुलांना स्पृश करणे निषेध होते.

७. कुष्ठरोग्या व्यतीरिक्त इतर व्यक्तीबरोबर खाण्या पिण्यास मनाई होती.

कुष्ठरोग व कुष्ठरोगी यांच्या समस्या अनादीकाळापासुन चालत असलेल्या आहेत. तरी यांच्या समस्येवर समाजात व शासन दरबारी काहीतरी मंथन झाले पाहिजे जेणे करुन कुष्ठरोग झालेल्या रुज्जां-ना वैयक्तीक व सामाजीक पातळीवर सन्मान मिळाला पाहिजे या दुष्टीकोणातुन 'नांदेड जिल्हयाती कुष्ठरोग्याच्या समस्या : एक समाजशास्त्री अभ्यास ' हा विषय संशोधनासाठी मी निवडलेला आहे.

<u>ज़ु ष्ठरोगावरील औषधाचा शोध :-</u>

कुष्ठरोग हा अतिप्राचीन काळापासुन माहित असला तरी रोगाचे कारण त्यावरील उपाय याचे ज्ञा-न न झाल्या-ने ज़ु ष्ठरोगातून कालांतराने अटळपणे येणाऱ्या विद्रुपतेमुळे या रोगाबद्दल मानसाच्या मनात भिती वाटु

लागली. अशा महाभयंकर रोगावर पाश्चत्य जगात १५ व्या शतकात संशोधनाला सुरुवात झाली. मा-नसाला होणाऱ्या जीवघेण्या रोगावर संशोधन सुरु झाले हा रोग सुक्ष्मजंतुमुळे व जीवाणुमुळे होतो ही परिकल्पना मनाशी बाळगुन संशोधन होऊ लागले. त्या काळात लिव्हेन हॉक (१८३२-७३) या डच शास्त्रज्ञाने सुज्मदर्शकाच्या शोधामुळे पुढे फ्रेंच शास्त्रज्ञ लुई पाश्चर (१८२२-९५), इटालीयन शास्त्रज्ञ रॉर्बट कोख (१८४३-१९१०), रशिय-न शास्त्रज्ञ एली लेचानिकॉफ (१८४५-१९१६) यांना सुक्ष्मजंतु शास्त्रातील संशोधनास मदत झाली त्यांनी मानव संहार करणाऱ्या साथीच्या असाध्य वाटणाऱ्या अशा रोग्याचे जंतु शोधुन ज ाढले सर एडवर्ड जेन्नर (१७४९-१८२३) यांनी देवीची लस शोधुन काढली आणि मग प्रथम एका रोगाचे सुक्ष्म जंतु शोधुन ज ाढले त्यावर प्रतिबंध लस तयार करणे ती सार्वत्रीकरित्या ती समाजातील सर्व लोकाकारीता सर्व थरापर्यंत पोहचण्याचे काम सुरु केले. कुष्ठ रोग जंतुचा शोध लावुन आता सव्वाशे वर्षाचा ज ाळ झाला तरी या जंतुचे सर्व लक्षने मानवास उलगडली नाहीत. पण जगभर या विषयी संशोधन चालु आहे पुढील काही वर्षात कुष्ठरोगावर लस तयार करण्यात येईल असा मानस आहे.

कुष्ठसेवेला शास्त्र नवी दुष्टी देत आहे. आतातर कुष्ठसेवेचे सारे संदर्भच बदलत आहेत २००० वर्षा पर्यंत कुष्ठरोग उच्चाटनाचे उद्दीष्ठे ठेवले होते.

अगदी ॠग्वेद काळात या रोगाला कुष्ठ म्हणुन ओळखला जात होते. आयुर्वेदातील चटकसंहीतेत ज ुष्ठरोगाचे कारणे प्रकार यांचा उल्लेख आहे. प्राचीण काळापासुन परिणामकारक औषधी म्हणुन चोलमुज्ररा तेलाचा वापर करतात. भाऊ दाजी लाड (१८२४-१८७४) यांनी कवढी नावाच्या फळाचे ते कुष्ठरोगावर तयार ज े ले. कुष्ठरोगावर १९५० साली डिप्सॉन किंवा डी.डी.एस हे औषध समाविष्ठ झाले १९५५ साली भारतात राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रन मिशनची स्थापना झाली १९८१ मध्ये भारतात बहु विविध औषधोपचार सुरु झाले.

संशोधन विषयाची निवड :-

कुष्ठरोगी हा मानवच असतो म्हणुन त्यांना मानसासारखी वागणुक मिळावे कुष्ठरोग्याची समाजात होणारी अव्हेलना थांबली पाहिले. कारण कुष्ठ रोगाच्या बाबतीत लोकांच्या मनात असणारा गैरसमज व अज्ञ

ा-न दुर झाले पाहिजे. त्याच बरोबर कुष्ठ रोग्याचे जे प्रश्न असतील ते प्रश्न सोडविता आले पाहिजेत याच उद्देशाने हा संशोधन विषय निवडला आहे.

आजही ग्रामीण भागात कुष्ठरोग्याना खुप अनेक बाबीसंबंधी अपमानास्पद वागणुक दिल्या जाते त्यांना घरातुन वेगळे केल्या जाते याच बरोबर त्याच्या राहण्याची व्यवस्था वेगळी केली जाते. त्याचे कपडे, त्याच्या जेवनाच्या ताटाची व्यवस्था वेगळी असते. कुष्ठरोग दुरीकरणाचं ध्येय स्पष्ट आहे, ध्येयाप्रत नेणारा मार्ग स्पष्ट आहे. पण त्या मार्गावर अनेक मानवनिर्मित अडथळे आहेत. ते मानसिक आहेत म्हणुन ते दुर ज रण्यास मोठा काळ लागणार आहे. विज्ञानांन ग्वाही दिलेली आहे, वैद्यकशास्त्रांन आश्वासन दिलेल आहे पज ि आदिकालापासुन तयार होत आलेलं माणसांच मन कुष्ठरोगाविषयीच्या पुर्वग्रहामुळे काही अनामिक भितीनं ग्रासलेल आहे कुष्ठरोज्याच्या पुनर्वसनकार्यात तोच मोठा अडथळा आहे. आजही घरात, शेजारी किंवा नातेवाईकांपैकी कुणाला कुष्ठरोग झाला आहे अस कळलं की पती - पत्नी, भाऊ-भाऊ, आई- बाप ही रक्ताची, जिव्हाळयाची नातीसुध्दा विसरली जातात. माणसं माणुसकीला पारखी झाल्यासारखी वागु लागतात आणि कुष्ठबाधीताच्या जीवनाची जीवघेणी परवड सुरु होते. कुष्ठरोग्याला आजही घरात, समाजात स्थान -नाही. विज्ञान अस सांगतय की हे सर्व चुकीचं होतं आहे तरी अजुनी मानवी मनातील काही अंधारे कप्पे शिल्लक आहेत. मानसशास्त्राला त्या कप्प्यांच गुढ अजुनपर्यंत उकलेलं नाही. त्यांच अस्तित्व जाणवलेल आहे पण त्यावर अजुन प्रकाशझोत पडलेला नाही. ते होत नाही तो पर्यंत कुष्ठरोगाविषयीची अनामिक भिती संपुर्णपणे जाणार नाही. विज्ञान व शिक्षणाच्या प्रसारातुन आणि आचारातुन ते व्हायंच आहे. पण ती एक ज ाळखाऊ प्रक्रिया आहे.

एकंदरीत कुष्ठरोग्याच्या अनेक समस्या आहेत त्यात आर्थीक समस्या, सामाजिक, भावनिक ,वैवाहीक अशा अनेक समस्याचा चिकीत्सक पध्दतीने अभ्यास व्हावा या उद्देशाने मी 'नांदेड जिल्हयातील ु ष्ठरोग्यांच्या समस्या" : एक समाजशास्त्रीय अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाचे महत्व :-

कुष्ठ रोगाच्या बाबतीत लोकांच्या मनात कमालीची गैरसमजुत होती कुष्ठरोग्याच नाव ऐकल तरी सामाजातील लोक लांब लांब पळत असत एवढया मोठया प्रमाणात कुष्ठरोग्याचा तिरस्कार समाजातील लोक ज़ु ष्ठरोग्याचा करायचे परंतु कुष्ठ रोग इतर रोगा प्रमाणे नियमीत औषध उपचाराने बरा होऊ शकतो आणि तो पुर्ज शरीरातुन नाहीस होऊ शकतो आणि तो पुर्ण शरीरातुन नाहीस होऊ शकतो परंतु समाज त्या व्यक्तींना स्विकारत नाही त्यासाठी राहण्याची बसण्याची जेवनाची कपडयाची वेगळी व्यवस्था करतो त्यामुळे कुष्ठ रोज्यावर वेळोवेळी अपमानास्पद वागणुक येत असते.

म्हणुन काही लोकांना सामाजिक, आर्थीक, सामाजिक, सांस्कृतिक वैवाहीक, भावनिक आधिकार प्राप्त व्हावे या उद्देशाने सामाजिक संशोधन झाले पाहिजे हया रुज्जाच्या एकंदरीत काय ? समस्या आहेत याची माहिती सरकार दरबारी झाली पाहिजे. जेनेकरुन सरकार ज्या ज्या वेळी कुष्ठरोग्याच्या बाबतीत जे काही योजना आखेल त्या त्या वेळेस निश्चित या संशोधनाचा सरकारला फायदा होईल म्हणुन मी 'नांदेड जिल्हयातील 'नांदेड जिल्हयातील कुष्ठरोग्यांच्या समस्या" : एक समाजशास्त्रीय अभ्यास' हा संशोधनासाठी निवडला आहे.

साहित्याचे अवलोकन :-

कुष्ठमुक्त रोग्यांना एकदा लागलेला कलंक पुसुन टाकण समाजात इरत व्यक्ती प्रमाण वागण वावरण ज़ाम करण कस अवघड आहे समाज माणस बदलन किती कठीण आहे आणि त्यामुळे पुर्णवसन करने अशक्य होते हे प्रथम रत्नाकर मतकरीच्या "पानगळीचे झाड" या सत्यकथेवर आधारीत कादंबरीत आभ्यासायला मिळत असेच अनेक मान्यवरांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातुन या रोग युक्त लोकांना न्याय देण्याच काम केले आहे.

मराठीतील ललीत वाडमयात कुष्ठपिडीताची समस्या मध्यवृती असलेल्या "आनंदवन भुवन" गो.नि. दांडेकर आगतीका आणि धग, (उध्दव शेळके) तपस्या (डॉ. सुमंती क्षत्रमाडे) तृर्षात (पुष्पाकाने)त्याच बरोबर

अनुताई भागवतांचे सागरशक्ती आकाशी हे कुष्ठरोग समस्येला सरळसरळ भिडणारे तिन अंकी नाटक आहे, त्याच बरोबर स्पर्श अमृताचा एक अंकी नाटक शिवाय प्रख्यात नाटककार वसंत कानटेकर यांचे "वादळ मानसाळतय" हे नाटक आहेच मराठीत कुष्ठ प्रश्नाच्या बाजुचे चिंतन करणारे कादंबऱ्या आहेत. नाटके आहेत विशेष म्हणजे एक पुर्ण लांबीचा " स्वप्न तेच लोचणी " हा चित्रपटही आहे या चित्रपटाचा विशेष म्हणजे डॉ. शिवाजीराव पटवर्धनानी कुष्ठ प्रश्न समाजासमोर ठेवण्याचे उत्कुष्ठ साधन म्हणुन आतोनात आडचनीना तोंड देवुन तो चित्रपट तयार करुन घेतला.

कुष्ठरोगाच्या पुर्नवसनासंबंधीत साहित्य ही निर्माण झालेले आहे. त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल ते श्रीमती अनुताई भागवताचा डॉ. शिवाजीराव पटवर्धनाच्या त्या कन्या त्यानी तपोवनात केलेले ज ार्य अतिशय उल्लेखनीय आहे. त्याची भरारी (१९९४) मुक्ती (१९९५) आमचा काय दोष (१९९२) डॉ. सरोजा शहस्त्रबुध्दे व अनुताई वाघ "इंदन मम" (१९८६) अशा अनेक मान्यवरांनी आपल्या परिने कुष्ठ रोग व ज़ु ष्ठरोग्यावर साहित्य निर्माण केले आहे.

<u>संशोधनाची उदिष्टे :-</u>

'नांदेड जिल्हयातील कुष्ठरोग्यांच्या समस्या" : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयाचा अभ्यास ज रत असतांना समाजशास्त्रीय घटक महत्वाचे मानुन प्रस्तुत संशोधनासाठी पुढील उदिष्टे निश्चित केले आहेत.

१) कुष्ठ रोग्याना रोज मुक्त करने व कुष्ठरोग मुक्तना सामाजातील त्यांचे स्थान मिळवुन देजे.

२) कुष्ठ रोग्याच्या सामाजिक, आर्थीक, वैवाहीक बाबीचा अभ्यास करणे,

३) कुष्ठ रोग्याच्या समस्या समाजातुन घेउुन त्यावर उपाय सुचविने.

४) कुष्ठ रोग्याच्या पुर्नवसनाबाबद चिंतन करणे

संशोधन विषयाची गृहीतके :-

१) कुष्ठरोग्याना समाजात अपमानास्पद वागणुक मिळते

२) कुष्ठ रोग्याची सामाजिक, आर्थीक, परिस्थिती अत्यंत बिकट आहे.

३) कुष्ठरोग या आजारा बाबत सामाजातील गैरसमज दुर करण्यासाठी प्रबोधनाची आवश्यकता

४) समाजात कुष्ठरोग्याच्या आजाराबाबत अज्ञान दिसुन येते.

संशोधनाची व्याप्ती :-

जेत्र व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्यातील १६ तालुक्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

आशय व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनात कुष्ठ रोग्याचा सामाजिक, आर्थीक वैवाहीक, पुर्नवसन विषयक हक्क इत्यादी अंगाचा विचार करण्यात येणार आहे.

संशोधन पध्दती :-

कुठलेही संशोधन विषयाचे अध्ययन करत असतांना संशोधनाची दिशा ठरविने महत्वाचे असते आणि त्यासाठी संशोधन पध्दतीची आवश्यकता असते कारण कोणतेही संशोधन हे संशोधन पध्दती शिवाय अपुरे असते त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयासाठी वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन आराखडयाचा वापर ज रण्यात येईल.

नमुना निवड :-

नांदेड जिल्हा हे प्रस्तुत संशोधनाचे कार्यक्षेत्र आहे त्यामुळे सदरील संशोधनामध्ये नांदेड जिल्हयातील सोळा तालुक्या अंतर्गत येणाऱ्या गावातील कुष्ठरोग्यांची संहेतुक नमुना निवड पध्दती या नमुना निवड तंत्राचा वापर ज रज्यात येणार आहे. नांदेड जिल्हयातील इतर तालुक्याच्या तुलनेत लोहा तालुक्यातुन ५, धर्माबाद ५, ज्ंधार ५, उमरी ५, तर मुखेड,बिलोली, देगलुर,हदगांव, हिमायतनगर, किनवट, नायगांव नांदेड या प्रत्येकी तालुक्यातुन १० प्रमाणे कुष्ठरोग्याची नमुना म्हणुन निवड करण्यात येणार आहे कारण इतर तालुक्याच्या तुलनेत वरील ८ तालुक्यात कुष्ठरोग्याची संख्या जास्त आहे. व अर्धापुर तालुक्यात कुष्टरोग्याची संख्या ०१ असल्यामुळे त्या तालुक्याचा नमुना निवड पध्दती मध्ये समावेश करण्यात आलेला नाही. अशा प्रमाणे एकुण १५ तालुक्यातुन १०५ कुष्ठरोग्याची नमुना म्हणुन निवड करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकल्पनासाठी खालील स्त्रोताचा आवलंब केला जाणार आहे.

१) प्राथमिक तथ्य संकलन :- प्रस्तुत संशोधनात प्राथमिक तथ्य संकलनाचा वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रश्नावली आणि मुलाखत या तंत्राचा वापर केला जाईल. प्रश्नावली या तंत्राचा वापर सुशिक्षित ज़ु ष्ठरोग्यासाठी करण्यात येईल व मुलाखत या तंत्राचा वापर अशिक्षित कुष्ठ रोग्यासाठी ज रण्यात येणार आहे. या दोन तंत्राचा वापर करण्यात येईल.

२) दुय्यम तथ्य संकलन :- प्रस्तुत संशोधनात द्वितीय तथ्य संज् ल-नामध्ये शासज ीय, निमशासकीय, प्रकाशीत, अप्रकाशीत, विविध कुष्ठरोग्यांच्या संबंधी संशोधनपर अहवाल, लेख, मासिज्े, वृत्तपत्रे,ज़ु ष्ठरोग्या संबंधी पुस्तके इत्यादी साधनाचा वापर केला जाईल.

माहिती संकलन व विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधना संबंधीत माहिती संकलीत करीत असतांना प्राथमिक तसेच दुय्यम स्वरुपाच्या तथ्याचे विश्लेशनासाठी विविध तत्राचा आवलंब करण्यात येईल, यामध्ये प्रामुख्याने तालीका, आलेख, शेकडेवारी, या संख्याशास्त्रीय परिणामाचा अवलंब केला जाईल या विश्लेषनाच्या आधारे निष्कर्ष काढण्यात येतील तसेच 'नांदेड जिल्हयातील कुष्ठरोग्यांच्या समस्या" : एक समाजशास्त्रीय अभ्यास' या विषयावर पुढील प्रकरणाचा माध्यमातुन संशोधन करण्यात येणार आहे.

प्रज रज - निहाय योजना :-

सदरील संशोधन विषयात एकुण सहा (०६) प्रकरणाद्वारे अभ्यास करण्यात येईल ते प्रकरणे खालील प्रमाणे आहेत.

प्रज रज पहिले	**:-**	प्रस्तावना
प्रज रज दुसरे	**:-**	संशोधन पध्दती व साहित्य अवलोकन
प्रकरण तिसरे	**:-**	कुष्ठरोग्याचे वैवाहीक व कौटुंबिक जीवन व त्यांचे सामाजिक, आर्थीक जीवन
प्रकरण चौथे	**:-**	कुष्ठरोग्याचे पुर्नवसन विषयक सद्यास्थिती
प्रज रज पाचवे	**:-**	कुष्ठरोग्यांच्या समस्या व उपाययोजना
प्रज रज सहावे	**:-**	निष्ज् र्ष

संदर्भग्रंथ सुची :-

१. डॉ. भाऊदाजी : व्यक्ती काल कर्तृत्व दै, लोकसत्ता १९७१

२. कुष्ठरोग माहितीपत्रक अशासकीय : १९९४

३. शरद नाईक : संपादित, कुष्ठरोग अदयावत माहिती १९९६

४. जगदीश टि.एन. : फुल फिलमेंट थ्रुलेप्रसी, कस्तुरबा कुष्ठ निवारण निलयमश मलवन्थमल तामीळनाडू १९८८

५. गुप्ता रमेश : रोग मुक्तांची कर्मभुमी, मुक्ती सदन साधना, १ डिसेंबर १९६२

६. मतकरी रत्नाकर : पानगळीच झाड, मॅजेस्टीक प्रकाशन मुंबई १९८६

७. अनुताई भागवत : 'भरारी' देशमुख आणि कंपनी, पुणे १९९४

८. डॉ. सुमती क्षत्रमाडे : तपस्या, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे, १९८१

९. डॉ. सरोज सहस्त्रबुध्दे आणि भागवत अनुताई : आमचा काय दोष, साधना प्रकाशन, पुणे

१०. बाबा आमटे : प्रकाशाची चाहुल देणारे पाऊले ' करुणेचा कलाम, वसुधा प्रकाशन, नागपुर १९८४

११. बापट ब.ग. : बाबा आमटै, राजहंस प्रकाशन प्रा.लि, १०२५ सदाशिव पेठ, पुणे -४११०३०, आवृत्ती नववी : मार्च २०१३

संशोधज विद्यार्थी

पवित्रे ज्ि श-न यादवराव

एम.ए. (समाज शा., शिक्षण शा.)

बी.एड् नेट समाजशास्त्र

संशोध-न मार्जदर्शज

डॉ. बुरुडे एस.बी.

समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक

मार्गदर्शक, श्री. शिवाजी कॉलेज कंधार

ता. कंधार जि. नांदेड